# असग़र वज़ाहत यांच्या

## दहा अनुवादित लघुकथा : **संवाद लेनिनच्या पुतळ्याशी**

१ लेनिनचा पुतळा तोडला गेला पण नंतर प्रश्न निर्माण झाला, की तो फेकून कुठे द्यायचा. बरीच चर्चा झाली. वादविवाद झडला. त्यातूनही काही तड लागेना तेव्हा लेनिनचा पुतळाच म्हटला, मला तिथेच फेकून द्या जिथं हजारो वर्षांपासून तोडलेल्या मुर्त्या व पुतळे फेकून दिले जातात.

२ लेनिनचा पुतळा तोडल्यावर चर्चा सुरू झाली की तो नक्की कुणी तोडला. सगळेजण आपापले दावे करू लागले. एकाने म्हटलं, मी तोडला. दुसरा म्हटला, नाही, मी तोडला. हळूहळू वादावादी आणि मग थेट हाणामारी सुरू झाली. याचं कारण साधं होतं, लेनिनचा पुतळा ज्याने तोडला असं ठरेल त्याचं करियर घडणार होतं. काहीच तड लागेना तेव्हा लेनिनचा तुटलेला पुतळा म्हटला, खरं सांगू, तुम्ही कुणीच माझा पुतळा तोडला नाही. माझ्याच माणसांनी माझा पुतळा तोडलेला आहे.

३ लेनिनचा पुतळा जसजसा तोडला जाऊ लागला तसं त्याच्या चेहऱ्यावर स्मित पसरू लागलं. थोड्या वेळानं तर पुतळा हसू लागला. तोडणारे हैराण झाले. एकाने विचारलं, तुम्ही का हसता आहात? तुम्हाला तर तोडलं जातंय. पुतळा म्हटला, तुम्ही माझं आवडतं काम करता आहात. तोडणाऱ्यानं विचारलं, ते कसं? लेनिन म्हटला, आयुष्यभर मी तर हेच करत होतो.

४ लेनिनच्या पुतळ्याने तोडणाऱ्यांना प्रश्न केला, तुम्ही कुणाची मूर्ती तोडता आहात? तोडणारे म्हटले, लेनिनचा. पुतळ्याने विचारलं, तुम्हाला माझं पूर्ण नाव माहिती आहे? तोडणारे म्हटले, आम्हाला आमची पूर्ण नावं माहिती नाहीत, तुमचं कसं माहीत असणार!

५ लेनिनच्या तुटलेल्या पुतळ्यानं तोडणाऱ्यांना विचारलं, तुम्ही फक्त तोडता की तुम्हाला काही जोडताही येतं? ते म्हटले, जोडायचं काम आमचं नाही. पुतळ्यानं विचारलं, जोडणारे कुठं आहेत? तोडणारे म्हटले, ते काय, ते तिकडं बसले आहेत. पुतळ्यानं विचारलं, का बरं? का बसले आहेत ते तिकडे? तोडणारे म्हटले, आम्ही इतकं तोडून फोडून टाकलंय, की त्यांना कळतच नाहीय की कशाला काय जोडायचंय.

६

पुतळ्यानं तोडणाऱ्यांना विचारलं, पुतळ्याशिवाय तुम्ही काय काय तोडू शकता? तोडणारे म्हटले, बरंच काही. जे जे आमचं नावडतं आहे, जे आम्हाला आवडत नाही, ते आम्ही तोडतो. मोठमोठ्या इमारती तोडतो. जिवंत माणसांनापण तोडतो. प्रेतंही तोडतो. तरबेज झालो आहोत आम्ही तोडण्यात. आमच्यासारखं कुशल काम कुणी करू शकणार नाही. पुतळ्यानं विचारलं, तुम्हाला जोडता येतं? तोडणारे म्हटले, म्हणजे काय असतं नेमकं?

७

पुतळ्यानं तोडणाऱ्यांना विचारलं, दुसऱ्या देशातही असं पुतळे तोडणं सुरू आहे काय?
तोडणारे सुहास्यवदनाने म्हटले, हे पवित्र काम तर साऱ्या जगात होतं आहे.
पुतळ्यानं विचारलं, कोण कोण करतंय हे काम?
तोडणारे म्हटले, जे जे असं काम करतात ते सगळे आमचे भाईबंद आहेत.

८

तोडणाऱ्यांनी पुतळ्याला विचारलं, तुम्हाला वाचवायला कुणीच कसं नाही आलं?
पुतळा म्हटला, आधी ते स्वतःला वाचवू शकले तर मला वाचवायला येतील ना!

९

पुतळ्यानं तोडणाऱ्यांना विचारलं, तुम्हाला माझ्याबद्दल इतका तिरस्कार होता तर मग तुम्ही या आधीच मला का तोडलं नाही?
तोडणारे म्हटले, आम्हाला विरोध होईल अशी भीती होती.
पुतळ्यानं विचारलं तुम्हाला विरोध झालेला आवडत नाही?
तोडणारे म्हटले, अजिबात नाही. आम्हाला विरोध आणि विरोधक दोन्हीही आवडत नाहीत. आम्ही शूर आहोत. आम्ही तिथेच आपलं शौर्य दाखवतो जिथे आम्हाला कसलाच विरोध नसतो.

१०

लेनिनच्या पुतळ्यानं विचारलं, पुतळ्यांशिवाय तुम्ही अजून काय काय तोडणार आहात?
ते म्हटले, आम्ही तोडण्यात पटाईत आहोत. मनाला वाटेल ते तोडू शकतो.
लेनिनचा पुतळा म्हटला, तुम्ही वाटेल ते तोडू शकता, पण लोकांचं धैर्य कधीही तोडू शकणार नाहीत.

**असग़र वज़ाहत**